Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.3 ISSN No. 2456-1665

# मराठी वाङ्‌मयास महानुभाव पंथाचे योगदान

**डॉ.सुधाकर जाधव**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय
मंठा जि. जालना

**प्रस्तावना :-**

महानुभाव पंथ हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा आणि प्रभावशाली धार्मिक संप्रदाय आहे. संत ज्ञानेश्वराच्या काही काळ अगोदर महानुभाव पंथ किंवा संप्रदाय उदयास येऊन त्याद्वारे मराठी गद्याची सुरूवात झाली. महानुभाव पंथाचे प्रणेते चक्रधर स्वामी यांनी गुजरातेतून महाराष्ट्रात येऊन मराठीला प्रथमच धर्मभाषेचा मान मिळवून दिला. महानुभाव पंथाची स्थापना इसवी सन १२०० च्या सुमारास झाली. महानुभाव पंथाचे मुळ पुरूष श्रीगोविंद प्रभु उर्फ गुंडम राहुल हे प्रणेते होय. चक्रधर यांचा कालखंड इ.स.११९४ ते १२७२ असा आहे. हा कालखंड अत्यंत समृद्धीचा पण धार्मिक ग्लानिचा कालखंड म्हणूनही ओळखला जातो. देवगिरीच्या यादवांची कारकीर्द हेमाद्री पंडिताची चतुवर्ग चिंतामणी आणि सामान्यांच्या हाल अपेष्टाचाही कालखंड समजला जातो. देवतापूजन व जातिभेदावर हल्ला चढविला, महानुभाव पंथाने अहिंसा, वैराग्य, भुतदया, संन्यास, दिक्षा यामध्ये स्त्री शूद्रारिकांना प्रवेश दिला म्हणूनच मराठीला पहिल्या कवयित्रीच्या रूपाने महदंबेचा लाभ झाला.

श्री चक्रधर पंथाचे प्रवर्तक असले तरी त्यांची स्वत:ची गुरू परंपरा फार थोर व प्राचीन आहे. श्रीकृष्ण हे या पंथाचे आदि दैवत आहे. श्रीदत्तात्रय प्रभू हे आणखी देवत असून त्यांच्यापासून श्री चांगदेव राहुळांना श्री चांगदेवर पासून श्री गोविंद प्रभूना व श्री श्रीगोविंद प्रभूपासून श्री चक्रधरांना ज्ञान प्राप्ती झाली.

महानुभाव पंथ म्हणजे महान अनुभवोस्तेजा बल वा यस्थ स:महानुभव: मोठा तेजाने युक्त असलेल्या लोकांचा मार्ग तो महानुभाव पंथ असे वि.भि.कोलते म्हणतात. या पंथाचे पूर्वीचे नाव परमार्ग असे होते परंतु पहिल्यांदा संत एकनाथांनी महानुभाव पंथ हे नाव दिले असे शं.गो.तुळपुळे म्हणतात. १३ व्या शतकात महानुभाव पंथ हा अत्यंत लोकप्रिय पंथ होता. मराठी वाङ्‌मय हे धार्मिक प्रसारासाठीच महानुभाव पंथात निर्माण झाले. चार्तुव्रण्याचे वर्चस्व कमी करण्याची ही एक चळवळ चक्रधरांनी बनवली त्यासाठी लोकांच्या भाषेत ग्रंथनिर्मिती झाली आणि हिच ग्रंथनिर्मिती, मराठी गुजरातेतून आलेल्या चक्रधरांनी मराराष्ट्राला कर्मभूमी मानले. तेलगंना, कर्नाटकात अनुयायांना

जाण्यास बंदी घातली पण त्यांचा प्रसार उत्तर भारतात पंजाब आणि काश्मीर पर्यंत झाला, उत्तरेकडे या पंथाला जयकृपाणी पंथ म्हटले जाते.

महानुभाव पंथाला वारकरी पंथासारखे अमाप यश मिळाले. नाही तरी त्यांचा पंथ इतर प्रांतात तसेच मुंबई, दिल्ली व अमृतसर याठिकाणी महानुभावांची कृष्णांची मंदिरे आढळतात. हिंदू फकीर म्हणून औरंगजेबाने त्यांना जिझिया कर माफ केल्याचे. उद्लेख आढळतात. महानुभावांच्या मराठी विषयक आत्मीयतेमुळे पंथातील व्यक्तीनी विविध वाङ्मय प्रकारात रचना करून साहित्य समृद्ध केले आहे. स्मृति संकलनात्मक गद्य चरित्र वाङ्मय ही या पंथाची मराठी साहित्यास लाभलेली फार मोठी देणगी आहे.

महानुभाव संप्रदायातील चरित्र ग्रंथवैभव उल्लेखनीय असून मराठीचा आद्यचरित्रकार म्हणून म्हाईंभट यांचा गोरख कैला जातो. म्हाईंभट हे मराठवाडयातील सराळे या गावचे. त्यांचा लीळा चरित्र, गोविंदप्रभू चरित्र, मूर्तिप्रकाश, श्रीकृष्ण, सुत्रपाठ, दृष्टांत पाठ व रत्नमालास्त्रोत्र आदी चारित्रांची त्यांनी सामान्यांचे जीवनचरीत्र सांगण्यासाठी तसेच लोक विलक्षण चरित्रांसाठीही केला. तत्कालीन चालिरिती; परंपरा, सांस्कृतिक व धार्मिक, जीवनाचे यथार्थ चित्रण यात आली आहे. साधी भाषा, छोटी छोटी वाक्ये, म्हणी व वाक्यप्रचार यांचा वापर यामूळे गद्य शैलीचा अपूर्व नमूना दिसून येतो.

महानुभाव साहित्याविषयी डॉ. ल. रा. नासेराबादकर लिहितात मराठी ललित गद्याची मुहूर्तमेढ महानुभावांनी रोविली. हे गद्य मात्र काव्यालाही लाजवील इतके मृदु होते. यादवकालीन राजकीय, धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे दर्शन ते घडविते. तत्कालीन भाषाबोली, त्यातील म्हणी वाक्यप्रचार यासह ते आपणास परिचित होते.

आपल्या स्वामीचा सामान्य परिवार नागवू नये म्हणुन संस्कृत ऐवजी मराठीत ग्रंथरचना करण्याचा त्यांचा आग्रह त्यांची समाजाभिमुखताच स्पष्ट करतो. चक्रधरांच्या नंतर सुमारे ६०-७० वर्षांनी मात्र मराठीतील हे गद्य पद्य भांडार सकळ, सुंदर इ. लिपींच्या कडीकुलुपात बंदिस्त झाले आणि सुमारे सातशे वर्ष मराठी समाज त्यापासून वंचित राहिला अर्थात अशा बंदिस्त पणामुळे हे वाड्.मय विपर्यस्त बनले नाही, ते मूळ स्वरूपात अबाधित राहिले. आणि तेराव्या शतकाच्या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे अस्सल दर्शन घडवू शकले. नसिराबादकरांच्या मतानुसार महानुभाव वाड्.मय हे मराठी वाड्.मय. न राहता ते फक्त महानुभाव पंथ आणि त्यांचे अनुयायी यांच्यापुरते मर्यादित राहिल्यामुळे विपर्यस्त बनले नाही. ते मुळ स्वरूपात अबाधित राहिले आणि तेराव्या शतकाच्या महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे अस्सल दर्शन घडवू शकले. नासिराबाद करांच्या मतानुसार महानुभाव वाङ् मय हे मराठी वाड्.मय न राहता ते फक्त महानुभाव पंथ आणि त्यांचे अनुयायी यांच्यापुरते मर्यादित राहिल्यामुळे विपर्यस्त बनले नाही, पण याचा परिणाम मराठी

वाड्.मयावर नक्कीच झाला मराठी, वाड्.मयाभ्यासक ह्या गद्यपद्य भांडारापासून वंचित राहिले. आजही एखाद्या ग्रंथाचा अनुवाद करावयाचा असेल तर, महानुभाव आश्रम त्यांचे साधक यांच्या परवानगी शिवाय हे करता येत नाही यामुळेच की काय ज्ञानेश्वरांची संत मांदियाळी आणि महाराष्ट्रीयन समाजआजही वारकरी संप्रदायाच्या रूपाने समाजावर आपला प्रभाव टिकून आहे आणि महाराष्ट्रीयन समाज आजही वारकरी संप्रदायाच्या रूपाने समाजावर आपला प्रभाव टिकून आहे, आणि महानुभाव पंथाची पिछेहाट दिसून येते. संताप्रमाणे आपले साहित्य समाजात रूजवले असते, तर आज परिस्थिती वेगळी असती, असे वाटते महानुभाव सांप्रदायिकर्नी आपल्या पंथाचे तत्वज्ञान व आचारधर्म यांच्या प्रचारासाठी ग्रंथरचेनी कास धरली संस्कृत भाषेचे प्राबल्य असलेल्या काळात मराठी भाषेत ग्रंथरचना करून त्यांनी सर्वसामान्य माणसापर्यंत आपल्य पंथाचे तत्वज्ञान नेऊन पोहचविले म्हणूनच त्यांचे ग्रंथवैभव समाजाभिमुख झालेले दिसुन येते.

महानुभाव पंथात साती ग्रंथा ना अनन्य साधारण महत्य आहे ते साती ग्रंथ

१) रूक्मिणी स्वयंवर - नरेंद्र इ.स. १२९२ रामदेवराय यादव हा राजा साहित्य-कलाप्रेमी होता. नरेंद्र हा त्यांच्या दरबारातील एक कवी होता या कवीने श्रीकृष्ण कथेवर केलेले आवाहनात्मक कव्यलेखन म्हणजे रूक्मिणी स्वयंवर हे काव्य होय. हा काव्यग्रंथ एकूण १८०० ओव्यांचा असून तो इ.स. १२९२ (श.१२१४) मध्ये लिहिला. राजाला हा ग्रंथ खूप आवडला, त्यांनी द्रव्याचे अमिष दाखवून आपल्या नावावर करण्यास सांगितले तेव्हा नरेंद्र म्हणतों, ना राजेहो आमुच्या कविकुळा बोलु लागेल स्वतःची काव्य निर्मिती प्रतिमा नरेंद्राजवळ असल्याने त्याने हे काव्य सुंदर रितीने रचेले होते. श्रीकृष्ण आणि रूक्मिणीचे वर्णन तयांमाजि रूक्मिणीचे रूप, जैसे सिध्दरसाचे लेप की ते चंद्राचे पुडिय नी कोष, कांडारिले की ते भुवन-मठिची अंबिका, की सौर्य-लेकिंची तारका ना तरि जना पत्रिका, मन्मथाची.

वर्णनांमध्ये विविध प्रकारचे तपशिल आहेत पण प्रत्यक्ष स्वयंवराचे वर्णन नाही. शेवटी इतर ग्रंथाप्रमाणे फलश्रुती सांगितली आहे.

जेयासी परमेश्वर भक्तीची वाड ते ऐकतू हे कथा अमरगोड तेया काहीची नाही अवघड जन्ममरणाचे अशा प्रकारे नरेंद्राने काव्यात कलाविलास दाखविला आहे. त्याची प्रतिभा अनेक ठिकाणी दिसून येते.

२) शिशुपाल वध भास्करभट्ट बोरीकर इ.स.१३१३ (श.१२३५) भारकरभट् बोरीकरांच्या व्यक्तिमत्वात प्रतिभा, प्रज्ञा व पंथनिष्ठा यांचा त्रिवेणी संगम दिसून येतो काव्यद्दपट्या हा ग्रंथ सरस आहे. कवीच्या उत्कट कृष्णभक्तीचा प्रत्यय येतो. ग्रंथाची ओवीसंख्य १०८७ असून यात रूक्मिणी विरह वर्णनाला प्राधान्य दिसून येते निसर्गवर्णने आणि कावित्याबद्दल आत्माविश्वास आहे. धारागृहाचे वर्णन करतांना बोरीकर म्हणतात.

ते धारागृह नवल याणिता विरहोपचार ठाकैल तन्ही आइकतु रसाळ : ठभनी ते
कस्तुरीएचा पल्हो चीवडूनि कमळांचे : तीथरे रचुनि
कुमोदांचे पराग कालवूनिः गोटि पाहिली.
अशोकाचियाँ भीती : कणिकरांची चित्रे उमटती
जवाक्षे वाहाकांती: मदन मोगरेयाची
चंद्र बिंबाचेनि पाडे : दिसत असे चोबडे
अरूवार घडले दळवाडे : कापूर केळीचे
वेदान्तापासून श्रृंगारापर्यंत कवीची गती आणि अलंकार वैभवही दिसून येते भक्तीला रूसपदवी देणारा कवी.

३) उध्दवगीता : भास्करभट्ट बोरीकर इ.स.१३१४ (श.१२३६) भास्करभट्ट बोरीकरांचाच हाही ग्रंथ आहे. एकदशस्कंधावरील ही टीका आहे. ओवोसंख्या ८२७ आहे. हा ग्रंथ निवृत्तीवर असल्याने स्त्रीनिरा दिसून येते.

तैसे फुरति तुंब : नवरसाचे
एसिया कवितालते : ब्रम्हाविद्येची फुले दिसति फांकते
तरि पसरोनि हाते : कवण न तोडी ?
कवी भास्करभट्ट यांचा पिंड रसिक कवीचा असल्याचा प्रत्यय काव्यातून येतो नरेंद्राप्रमाणे त्यांनीही फलश्रृती सांगितली आहे.

या आईकता उध्दवगीताः प्रवोध उपजे श्रोतेयां चिया चिता परब्रम्हेसी होव सोडाज्यता म्हणे कवि भास्करू

४) वछाहरण : दामोदर पंडित इ.स.१३१६ (रा.१२३८) दामोदर पंडितांनीही भागवतांच्या दशमस्कंधातील १२, १३ व १४ या अध्यायातील अधासुरवधाची व वत्सहरणाची कथा यावर काव्याची उभारणी केली आहे. ओवीसंख्या ५०३ आहे. श्रीकृपण विषयक भक्तिभावाच्या कवीने काव्यात मोकळीक दिली आहे. अलंकाराचा वापरही मुक्तपणे करण्यात आला आहे.

एकेकि अवेवीचा वरवेपाणी: मदनाचि किजेअँ वालणि ल.रा. नासिरावादकर दामोधर पंडितांना संतकवी म्हणावयास हरकत नाही असे अभिप्राय देतात.

५) ज्ञानप्रबोध पं. विश्वनाथ वाळापूरक इ.स. १३३१ (रा.१२५३) भगवद्गीतेवरील ज्ञानेश्वरी ग्रंथाचा प्रभाव ज्ञानप्रबोधवर असल्याचे विज्ञान म्हणतात. तेराव्या अध्यायात ज्ञानलक्षणे सांगणाऱ्या श्लोकांवरील रसाळ भाष्य म्हणजे हे काव्यओवी संख्या १२०४ आहे. प्रारंभीच्या १२५ ओव्या ज्ञानलक्षणे स्पष्ट करणाऱ्या असून त्यानंतरच्या ओव्याची रचना

सिध्दात कर्पूरवासे घोळून साहित्य वसे,
भावविडा प्रबंधभिषे स्वामी देईन
लटके वाजाळ न बोले पाल्हाळ
बोल भागगर्भ रसाळ तैसे बोलुन
ग्रंथचाचनाची फलश्रुती ही दिली आहे.
आणि सावधाने चित्तें जे अभ्यासिती या ग्रंथाते दैव दशाये सुख श्री तयांते अधिपठी
विरक्ती आणि ईश्वरीभक्ती असे या काव्यग्रंथाचे स्वरूप असून तत्वज्ञान ग्रंथ म्हणून ज्ञानप्रबोध ची ख्याती आहे.
गीतेवरील अनेक भावयापैकी केवळ याच ग्रंथाचा साती ग्रंथात उल्लेख होतो.
६) सह्याद्री वर्णन : खळोव्यास इ.स.१३३३ (श.१२५५) महानुभाव पंथातील एकनिष्ठा उपासक म्हणून खळोव्यास यांचा लैकिक होता.

महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्रीचक्रधर श्रीगोविंदप्रभू यांच्या वास्तव्याने पुनित झालेले जसे ऋषिंदपूर तसेच श्रीदत्तात्रयाचे सह्याद्रीवर्णन असे म्हटले जाते पंचकृष्णापैकी श्रीदत्तात्रय हे एक आहे. महानुभाव पंथातील एक थोर अवतारी पुरूष म्हणुनही त्यांची ख्याती होती.
तथा श्रीचक्रपाणिचेन : वरप्रसदि मी करीन मुर्ती-लिला-वर्णन: श्रीदत्तात्रेयाचे या ग्रंथाची ओवीसंख्या ५१७ आहे. सह्याद्रीवरील काही स्थानवर्णनेही या ग्रंथात आली आहेत श्रीचक्रधर चे चरित्रही याठिकाणी आले आहे. या ग्रंथातही फलश्रुती सांगितली आहे.
ऐस या ग्रंथात जे पाठ करिती १ तथा भावपूर्वक आइकती ते वाचे ही मंगलरूप होती म्हणताय रामु या ग्रंथात ईश्वरभक्तीचे महत्व पटवू दिले आहे.
७) ऋध्दिपूरवर्णन नारोव्यास बहाकिये इ.स.१३६३ (श. १२८५) ऋध्दिपूर हे महानुभाव पर्यायाचे पवित्र ठिकाण श्रीगोविंद प्रभूचे दीर्घकाळ वास्तव्य या ठिकाणी होते. श्रीचक्रधरानीही या ठिकाणी राहून श्रीगोविंद प्रभूची सेवा केली. बाण अष्टमयचंद्र शोभनेसि आशा दे निशीकर चंद्रेसि ग्रंथु पावला सिध्दीसी ऋध्दिपूरवर्णनु या ठिकाणी कालनिर्देश दिसून येतो. या ग्रंथात महानुभाव पंथाविषयी गौखोद्गार व महानुभाव पंथाचे तत्वज्ञान हे दोन विषय आहेत. ऋध्दियूर परिसराचे तपशीलवार वर्णन, स्थलवर्णन आणि उत्कट भक्तिभाव या काव्यग्रंथातून दिसून येतो. प्रासारिक वर्णनातून कवीची श्रध्दा व आत्मा प्रत्यय दिसून येतो. हे स्वतंत्र व वैशिष्ट्यपूर्ण काव्य आहे.

वरील सातही ग्रंथ महानुभाव पूज्य ग्रंथ मानले जातात. महानुभाव पंथातील बहुसंख्य ग्रंथकार हे विद्वान व संस्कृत पंडित होते. त्यांना राजदरबारी मान्यता होती. तसेच सर्वांनाच श्रीचक्रधरांचा सहवास लाभलेला होता. पंचकृष्णापैकी एक चक्रधर त्यांचे व्यक्तीमत्व दिव्यभव्यनि सर्वसमावेशक

होते. महानुभावांचे आराध्यदैवत म्हणजे श्रीकृष्ण त्यामुळेच श्रीकृष्णजीवन हा बहुसंख्य महानुभाव कवींच्या काव्याचा विषय झालेला आहे. साती ग्रंथ श्रीकृष्ण भक्तीने उजळून निघालेले आहेत.

मराठी ललितगद्याची मुहूर्तमठ महानुभावानी रोविली, महानुभाव तत्वज्ञानाचा फार मोठा प्रभाव प्राचीन वाङ्‌मयावर पडलेला आहे. महानुभाव संप्रदायाचे लीलाचारित्रे, धवळे, मातृकी रूक्मिणी स्वयंवर ही यह महत्वाचे ग्रंथ आहे. तत्वज्ञान या ग्रंथात मांडण्यात आले आहे. या पंथात जीव, देवना, प्रपंच व परमेश्वर या चार वस्तू –नित्य मानल्या जातात. प्रत्येक महानुभावाला आचार धर्म पाळावा लागतो. संन्यास व गृहस्थ असे शिष्याचे दोन वर्ग या पंथात आहेत. जीवेश्वर भेद अस्तियोग, संन्यास व अहिंसा या चार तत्वांच्या आधारावर महानुभाव पंथ उभा आहे. साधकाला ज्ञान युक्त वैराग्य असावे. पंथात स्त्रीपुरुष भेद नाही. स्त्रीलाही संन्यास घेता येतो. पण साधकाने चित्रीची ही स्त्री नपहावी असा नियम आहे. साधकाने कदान्न खावे, तसेच पाच-सात दिवसापेक्षा जासत एकत्र राहू नये.

महानुभाव पंथाचे मराठी वाङ्‌मयात मोलाचे योगदान असूनही हा पंथ पंथ वारकरी पंथा एवढा का समाजात रूजला नाही. त्याचे कारण वैदिक धर्म हजारो वर्षापासून चालत आला होता. त्या सनातन धर्माविरुद्धची-बंडखोरी मुठभर उच्चवर्ग व सत्ताधीशांनी-उधळून लावली.

महानुभाव पंथाने शंकर विष्णु राम आदी देवतांची हेटाळणी केली. स्त्रियांना संन्यास घेण्याची मुभा दिली. महानुभाव पंथाचे तत्वज्ञानही सामान्य माणसाला न पेलणारे होते. सर्वसामान्य माणसाला हे: कडकडीत वैराग्य पेलणे केवळ अशक्य असल्याने त्यांनी पाठ फिरविली. महानुभाव पंथाचे अश अपयश बाजूला ठेवले तरी मराठी वाङ्मयास महानुभाव पंथाचे बहुमूल्य योगदान आहे हे विसरता येत नाही. गद्य,पद्य भांडारा सोबत म्हांईभटासाराखा आद्यचरित्रकार, महदंबासारखी पहिली मराठी कवयित्री मराठी वाङ्‌मयाला मिळाली. हे महानुभाव पंथाचे मराठी साहित्याला मिळालेले खुप मोठे योगदान होय.

## संदर्भ

१. प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास- डॉ.ल.रा. नासराबादकर
२. संत वाङ्‌मयाची सामाजिक फलश्रुती-गं.बा. सरदार